भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ४३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०६/२०१७

**१) शासकीय जागा असल्याचे भासवुन महिलेचा विनयभंग करुन शिवीगाळ व भांडण करुन थापडबुक्यांनी मारपिट केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०६/२०१७ चे १३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले शेतातील खड्डे बुजवित असतांना यातील आरोपीने खड्डे बुजविणे बंद करा ही वन विभागाची जागा आहे असे म्हटले असता फिर्यादीने आम्ही २० वर्षा पासुन शेती करीत आहोत असे बोलले असता आरोपीने ही जागा सरकारची आहे असे बोलुन फिर्यादीचे उजवे हात ओढुन तिचे ब्लावुज पकडले सदर बाब तिने घरी जावुन सांगितले असता तिचे पती व दिर यांनी वन विभागाचे कार्यालयात जावुन विचारले असता आरोपीने त्यांना शिवीगाळ व भांडण करुन थापडबुक्यांनी मारपिट केल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३५४,३२३,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन शासकीय वन जमीनीवर अतीक्रमन केल्याच्या याकारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन लोखंडी धारदार वस्तुने डावे भुईजवळ मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०६/२०१७ ते १५.३० ते १६.०० वा. दरम्यान यातील दोन्ही आरोपी यांनी शासकीय वन जमीनीवर अतीक्रमन केले असल्याने यातील फिर्यादीने त्याना थांबण्यास सांगुन आस.एफ.ओ माकडे सा. यांना भेटण्यास सांगितले असता यातील आरोपीनी वन कार्यालयात येवुन फिर्यादीस शिवीगाळ, भांडण करुन व करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केले आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे कॉलर पकडुन गळा दाबला व आरोपी क्र. २ ने कोणत्या तरी लोखंडी धारदार वस्तुने डावे डोळयाचे भुईजवळ मारुन जखमी करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने तसेच सार्वजनीक संपत्तीची आगडीक व हानी केल्याने फिर्यादी वैभव यशवंत उगले वय ३२ वर्ष, रा. तुमसर (वनरक्षक कार्यालय नाकाडोंगरी ह. मु. पवनारखारी) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे गोबरवाही येथे कलम ३५३,३२४,३३२,५०४,५०६,३४ भांदवी. सहकलम ३(१) सार्वजनीक हानी प्रती. अधि १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन विवाहीतेस शारिरीक व मानसीक त्रास देवुन भांडण व मारपीट केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०६/०६/२०१७ ते ११.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे लग्न दिनांक ०२/०५/२०१७ ला आरोपी क्र. १ सोबत झाले असुन तेव्हा पासुन फिर्यादीला आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. १ ला आरोपी क्र. २ चे सांगण्या वरुन माहेरुन सोन्याचे दागीने आण असे म्हणुन तिला शारिरीक व मानसिक त्रास दिले घटने दिवशी सुध्दा माहेरुन दागीणे आण म्हणुन भांडण करुन मारपीट करुन शारिरीक व मानसिक त्रास दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे मोहाडी येथे कलम ४९८(अ),३२३,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगुडे पो. स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**४) घराचे दरवाज्याचे कुलुप तोडुन आत प्रवेश बेडरुम मधील कपाटातील चांदीचे साहित्य व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक ०३/०६/२०१७ ते ०७/०६/२०१७ चे दिवसा रात्र दर. यातील फिर्यादी विजय वसंतराव रोकडे वय ४८ वर्ष, रा. सत्कार नगर नावरकर पेट्रोलपंप चे मागे नागपुर रोड भंडारा यांचे राहते घराचे समोरील दरवाज्याचे कोणीतरी अज्ञात चोराने कुलुप तोडुन आत प्रवेश करुन बेडरुम मधील कपाटात ठेवलेले १) पाच चांदीच्या वाटया वजन १० तोडे २) चांदीच्या तोरडया ४ जोड वजन ३ तोडे ३) चांदीची समई एक, दिवे चार नग वजन चार तोडे ४) चांदीचा छल्ला वजन तोडे ५) चांदीची अत्तरदानी एक, कटोरी एक वजन प्रत्येकी दोन तोडे ६) चांदीचे कडे दोन नग वजन दोन तोडे ७) चांदीचा करदोळा एक नग वजन दोन तोडे ८) चांदीचे सिक्के दोन नग वजन चार तोडे ९) चांदीचे चमचे दोन नग वजन पाच तोडे असा एकुण ३६ तोडे चांदी किंमती १४,४००/–रु. व नगदी १०,०००/–रु. असा एकुण २४,४००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि दांदळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक ०८/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा, जवाहरनगर, कारधा, करडी, तुमसर, सिहोरा व साकोली येथे अवैध देशी दारु जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २०८ लिटर हातभट्टी दारु+ ९७५ किलो सडवा + साहित्य + १ मोटार सायकल किंमती १,१७,८१०/–रु व ९०० लिटर मिली लीटर देशी दारु किंमती २५०/–रु. असा एकुण किंमती १,१८,९६०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

09.6

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.